दै. प्रजावाणी (२५)

वजिराबाद/इतवाऱ्यात तब्बल ४७ हरकती

# मतदारयादीवर ६२ आक्षेप

नांदेड, दि. २८ : महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रसिद्ध झालेल्या प्रारुप मतदारयादीवर महापालिकेकडे ६२ आक्षेप दाखल झाल्याची माहिती उपायुक्त (निवडणूक) संतोष कंदेवार यांनी दिली. या ६२ आक्षेपामध्ये सर्वाधिक ७० टक्के अर्थात तब्बल ४७ आक्षेप एकट्या वजिराबाद/इतवारा झोन क मधील आहेत.

गेल्या १९ ऑगस्ट रोजी मनपाने प्रारुप मतदारयादी प्रसिद्ध केली होती. नांदेड उत्तर व नांदेड दक्षिण या दोन्ही विधानसभा मतदारसंघातील मनपा क्षेत्राची फोड करून प्रभागनिहाय मतदारांची नावे या यादीत प्रसिद्ध करण्यात आली होती. प्रभाग क्रमांक १३ ते १७ मधील मतदारांनी आपली नावे शेजारच्या प्रभागात समाविष्ट झाल्याबाबत मोठ्या प्रमाणावर आक्षेप दाखल केले आहे. या चार प्रभागातील आक्षेप लक्षात घेता प्रारुप मतदारयादी तयार करताना मोठ्या प्रमाणावर घोळ झाल्याची ■ पान २ वर

मतदारयादीवर ६२...

ओरड केली जात आहे. काही मतदारांची नावे १ जुलै २०१७ दिनांकावर आधारीत विधानसभा मतदारसंघाच्या यादीत समाविष्ट असताना त्यांची नावे मनपा प्रारुप मतदारयादीतून गायब असल्याने अशा मतदारांनीही आपले आक्षेप दाखल केले आहे. १९ ते २८ ऑगस्ट या आक्षेप घेण्याच्या कालावधीत तरोडा झोन अ मध्ये ३, शिवाजीनगर झोन ब मध्ये १०, वजिराबाद झोन क मध्ये तब्बल ४७ व सिडको झोन ड मध्ये केवळ २ असे एकूण ६२ आक्षेप दाखल झाले आहेत.

मतदारांनी दाखल केलेल्या आक्षेपाची छाननी करताना लेखनदोष, दुसऱ्या प्रभागातील चुकून समाविष्ट झालेले अथवा संबंधित प्रभागातील विधानसभा मतदारयादीत नावे असूनही मनपाच्या प्रभागयादीतून वगळली गेली असल्यास मतदारांची नावे समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यांना आहेत. ही छाननी येत्या आठवड्याभरात पूर्ण करून दि. ७ सप्टेंबर २०१७ रोजी महानगरपालिका निवडणुकीसाठी वापरली जाणारी प्रभागनिहाय अंतिम मतदारयादी तसेच मतदान केंद्राची प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदारयादी अधिप्रमाणीत करून प्रसिद्ध केली जाणार आहे.

दै. देशोन्नती (२५)

# मतदार यादीतील नावासंदर्भात ४५ आक्षेप

## प्रभाग क्रमांक १५, १६ व १७ मधील नागरिकांचाच अधिक भरणा

*प्रतिनिधी/ २८ ऑगस्ट*

**नांदेड** : महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने जाहीर करण्यात आलेल्या प्रभागनिहाय मतदार यादीतील समावेशाबाबत २८ ऑगस्ट रोजी अखेरच्या दिवशी सायंकाळी ६ वाजेपर्यंत एकूण ४५ नागरिकांनी महापालिकेकडे आक्षेप नोंदविला असल्याची माहिती प्राप्त झाली.

आगामी महापालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदार यादी नुकतीच जाहीर करण्यात आली होती. या यादीत एका प्रभागात वास्तव्य असलेल्या मतदारांचे नाव दुसऱ्या प्रभागात समाविष्ठ झाले असल्याच्या अनेक तक्रार महापालिकेकडे प्राप्त झाल्या होत्या. घर एका प्रभागात आणि मतदार यादीतील नाव मात्र दुसऱ्या प्रभागात आल्याने नागरिकांमधून ओरड सुरू होती. त्यामुळे या नागरिकांना दिलासा देण्यासाठी महापालिकेने गेल्या १९ तारखेपासून आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला अनुसरून २४ तारखेपर्यंत २३ नागरिकांनी मनपा प्रशासनाकडे आक्षेप दाखल केले होते. त्यानंतर सलग तीन दिवस शासकीय सुट्या आल्या होत्या. त्यामुळे आज २८ ऑगस्ट रोजी अखेरच्या दिवशी आक्षेप दाखल करण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. क्षेत्रिय कार्यालय 'क' मध्ये १६, 'ब' मध्ये ५ तर 'ड' मध्ये १ असे आज एकाच दिवशी एकूण २२ अर्ज सायंकाळी ६ वाजेपर्यंत प्राप्त झाले होते. यात आणखी वाढ होवू शकते, असा अंदाज मनपातील सुत्रांनी वर्तविला असला तरी सायंकाळी ६ वाजेपर्यंत एकूण ४५ आक्षेप मनपाकडे प्राप्त झाले होते. आक्षेप दाखल करण्यात प्रभाग क्रमांक १५, १६ व १७ मधील मतदारांची संख्या अधिक असल्याचे सांगण्यात आले. प्राप्त झालेल्या आक्षेपानंतर सुधारणा करून प्रभागनिहाय मतदार याद्या ७ सप्टेंबर रोजी प्रसिध्द केल्या जातील, असे सांगण्यात आले.